# आदिवासी साहित्य-मौखिक परंपरा आणि आदितत्व

प्रा.डॉ.राजेन्द्र हावरे प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती मो.नं.9890327259

---

आदिवासी म्हणजे लोकसमाजाचा आदितम भाग. त्यांच्या प्राचीन परंपरा, विविध चालीरीती, त्यांची भाशा, रंगबेरंगी पोशाख, सामुदायिक जीवन, सुखदुःखातील सामुदायिक सहभाग, बहुरंगी उत्सव या सर्वच गोष्टी अभ्यासकांना मोहविणाऱ्या आहेत.

अशा या विविधरंगी संस्कृतीच्या अभ्यासाचे व अध्ययनाचे एक प्रमुख साधन म्हणजे लोकसाहित्य होय. आदिवासी जमातीचे लोकसाहित्य हे 'श्रुत' स्वरुपाचे असून एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे त्याचे मौखिक हस्तांतरण होत असते. मौखिक साहित्याची आपली स्वतःची एक लज्जत आहे. स्वतःची खुमारी आहे.

लोकसाहित्य हा लोकजीवनरीतीचा एक अविभाज्य भाग असतो. त्यामुळे लोकसाहित्यातील कोणत्याही घटकाची निर्मिती केवळ रंजनाच्या हेतूने झाालेली नसते. लोकसाहित्य हे लोकमानसाचे, लोकभावनांचे, लोकश्रध्दांचे, लोकधारणांचे व्यक्त रुप असते.

अलीकडच्या कालखंडात आदिवासी साहित्याचा अभ्यास जोमाने सुरू झाला आहे. नवोदित आदिवासी साहित्यिक मोठया उमेदीने लिहिण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आदिवासी समाज हा मुख्यत्वे आर्थिक शोषणाचा बळी ठरला आहे. डोंगर कपारीच्या आश्रयाने जीवन जगत असलेल्या या समाजाने शेकडो वर्ष लोटून गेली तरी आपली संस्कृती टिकवून ठेवलेली आहे.सामाजिक परिवर्तनाच्या आणि नागरी संस्कृतीच्या आलेल्या संपर्कानंतरही त्यांनी आपली संस्कृती टिकवून ठेवली आहे.

''आदिवासीच्या आनंदाचा स्त्रोत त्यांची संस्कृती आहे. त्यांच्या समाधानाची जननी त्यांची संस्कृती आहे. तीच त्यांची चेतना आहे आणि तिच त्यांची प्रेरणाही आहे. 'विविध कला, गीते, देवदेवता व त्यावरील विश्वास, सलग धर्माचरण पध्दती, रुढी, परंपरा, सलग कुलगोत्र पध्दती, ऐहिक आणि मृत्यूत्तर जीवन विषयक तत्वज्ञान ह्या सर्वामिळून त्यांच्या संस्कृतीची घडण झाली आहे' ही संस्कृतीच त्यांच्या शब्दांना अर्थप्रदान करते आणि मग हे शब्दगीत रुपाने त्यांच्या ओठावर तरळू लागतात हीच लोकगीते होत, लोक कथागीते होत. ह्या गीतांचे स्वरुप पारंपारिक आणि मौखिक असते.

या मौखिक परंपरेचा मागोवा घेत गेल्यास वेदपूर्व काळापर्यंत आपल्याला मागे पोहोचता येते. आर्य आणि अनार्याचे संघर्ष या संस्कृतीच्या इतिहासात प्रसिध्द आहे. याच अनार्यांना दास, दस्यू, नागा, द्रविड इ. नावाने इतिहासात संबोधल्या गेलेले आहे.

आर्याच्या उत्पत्ती बद्दलची कथा इतिहासात प्रसिध्द आहे. ती अशी की आर्याची उत्पत्ती इंद्रापासून झाली. ते इंद्राचे सर्वात आवडते पूत्र इंद्रानेच पणि, किरात आणि निषाद यांना सुध्दा उत्पन्न केले. परंतु ते कृतघ्न आहेत. इंद्रचा द्वेष करतात म्हणून इंद्र त्यांना पसंत करीत नाहीत. म्हणून इंद्राचे भक्त ते आर्य व जे भक्त झाले नाहीत ते अनार्य, दास या तुच्छतादर्शकशब्दांचे मानकरी ठरले. (राहुल सांकृत्यायन दिवोदास, तृतिय आवृत्ती, पृ.क्र. 60)

आर्याचा उल्लेख येण्यापूर्वी वैदिक साहित्यावरून सुध्दा असे दिसून येते की देव, असूर आणि नाग हे परस्परांचे बंधू म्हणून मानले जात होते. राक्षस म्हणून समजले जाणारे 'पूर्वदेव' होते. जातककथेतील एकतिसाव्या जातकात उल्लेख केल्याप्रमाणे देवाची व असुरांची जी दोन अयोध्य नगरे होती त्यांच्या रक्षणाची जबाबदारी इंद्राने करोटी, पयस्सहारी उरण या नागांवर सोपविली होती. नागांचा हा उल्लेख वेदपूर्व काळाच्या संदर्भाकडेच निर्देश करतो.

म्हणजेच वेदपूर्व काळापासून या भूमीत अनार्याची संस्कृती ही रुजलेली होती. या अनार्यांच्या, दासांच्या संस्कृतीवर आर्यांनी हल्ले केले. दासाषी युध्द केले. त्यांच्यावर अमानुष अशास्वाऱ्या केल्या. त्यांच्या कत्तली केल्या. पुरेच्या पुरे जाळून टाकली. 'कुत्स' 'अतिथिग्वो दिवोदास' 'सुदास' 'पुरूकुत्स' 'त्रयदस्यू' या आर्य महाभाग शुरविरांचा त्यात महत्त्वाचा वाटा होता. सिंधू संस्कृतीच्या उत्खननातून याचे सर्व पूरावे आपल्या हाती लागतात.

मौखिक परंपरेचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा साधारणतः कोणतीही लिपी अस्तित्वात येण्यापूर्वी 200वर्षे आधी त्या मौखिक परंपरेला सुरवात झालेली असते. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या खापराच्या मुद्रा त्यावर सिंधू लोकांची चित्रलीपी आहे. त्यांच्यावर वृषभांची, आर्यपूर्वाच्या देवाची, झाडांची, नदयांची तत्सदृष्य इतर पवित्र वस्तुंची चित्रे आहेत. म्हणजेच त्या काळी चित्रलिपी अस्तित्वात होती. याचाच अर्थ असा की त्या आधी साधारणतः 200 वर्षे तरी आधी ही मौखिक परंपरा कायम होती.

आणि तेव्हापासून चालत आलेली ही परंपरा आदिवासी संस्कृतीने अजूनही जोपासून ठेवली आहे. लोकगीते, लोककथा, लोकनाटय, म्हणी, उखाणे, वाकप्रचार, कोडी, मंत्र इ. स्वरुपात अजूनही आदिवासी समाजात ती प्रचलित आहे. लोकनाटय हा तर आदिम संस्कृतीचा व परंपरेचा आरसा आहे.

आदितत्व -

आदिवासीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करतांना आदिवासीच्या संस्कृतीचाही अभ्यास करावा लागतो. कारण लोकसाहित्याचा अभ्यास हा लोकमानसाच्या आविष्काराचा अभ्यास असल्यामुळे लोकमानस ज्या विविध माध्यमातून व्यक्त होते त्या सर्वांचा विचार करणे

क्रमप्राप्त असते. लोकभाषेचा अभ्यास हा लोकसांस्कृतिक अभ्यासाचा महत्त्वाचा भाग आहेच. भाषा वैज्ञानिक दृष्टयाभाषेचा अभ्यास होत असतोच परंतु त्यातून मानवी मनाचे विष्लेशण होत नाही. त्यामुळे शब्दबध्द आविष्काराबरोबरच लोकरुढी, लोकविश्वास, लोकभ्रम, चालीरीती, सण, वार, विधी इ. चाही अभ्यास करणे आवश्यक असते म्हणजेच पर्यायाने हा अभ्यास लोकधर्म व लोकसंस्कृती यांचा अभ्यास ठरतो आणि हा अभ्यास खऱ्या अर्थाने लोकतत्वीय-आदितत्वीय दृष्टीकोनातून केलेल्या अभ्यासातून मिळतो.

आदितत्व हा शब्द इथे मी हेतुपुरस्सर वापरला आहे. आदिवासीच्या संस्कृतीला आदी संस्कृती म्हणणे अधिक योग्य होईल. आदि संस्कृती-आदितत्व हा शब्दप्रयोग मला अधिक समर्पक वाटतो. कारण या देशात वैदिक-अवैदिक, आर्य-अनार्य अषी मांडणी केली जाते. ही मांडणी मला तत्वतः मान्य नाही कारण अनार्य म्हणताना मराठी भाषेचे वैशिष्टे हे की 'अ' हा उपसर्ग शब्दाच्या आधी लावला की नंतरच्या शब्दाचा अर्थ हा नकारात्मक होतो. एवढेच नव्हे तर हीन होतो. अनार्य-आर्य नाहीत ते-म्हणजेच आर्यांना श्रेष्ठत्व मिळते याचाच पुढील अर्थ असा होतो की, जे या भूमिचे मूळ मालक नाहीत त्याच्या नावाने भूमी ओळखणे आणि भूमीपूत्रांना कनिष्ठ लेखणे असा होतो. येथे देशीयतेचा मुद्दा ठामपणे लक्षात घेण्यासारखा आहे.

टीका स्वयंवर या ग्रंथात डॉ. भालचंद्र नेमाडे असे म्हणतात की 'देशीयता ही नैसर्गिक असते. नैसर्गिकपणे रान वाढावे, त्या रानातील झाड झाडोÚयांनी भूमीचे मुलद्रव्य शोषून नैसर्गिकपणे वाढावे, अशी संस्कृतीची देशीयता आपसूक वाढत असते'
या पार्श्वभूमीवर विचार केल्यास अवैदिक, अनार्य, शुद्र, दास, राक्षस, नाग इ. म्हणून ओळखल्या गेलेले 'लोक' या देशीयतेच्या परंपरेतील होते. या भूमीचे मूळ अधिवासी होते म्हणून अनार्य-अवैदिक या नकारात्मक संकल्पना वापरणे मला नेहमीच अवैज्ञानिक वाटते त्याऐवजी 'अधिवासी' याला समांतर असणारा 'आदिवासी' म्हणजे मूल निवासी हा शब्दप्रयोग अधिक सकारात्मक, अधिक मूलगर्भ, अधिक आदिम वाटतो.

आदिवासी लोकसंस्कृतीत, मौखिक परंपरेतही आदितत्वे मोठया प्रमाणात रुजलेली आहेत असे दिसून येते. या लोकसंस्कृतीत विविधता आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या या आदितत्वाचा आदिवासी समाजमनावर अजुनही प्रभाव कायम आहे. विधिच्या मुळाशी असलेले तत्व, त्याचे यात्वात्मक स्वरुप, यशपूजा व बळीच्या प्रथेचे अवशेष किंवा संकेत रुप ही ती आदितत्वे होत. आर्य पूर्वकाळापासून चालत आलेले यात्वात्मक तसेच सुपलीकरणाशी संबंधीत विधी, देव व त्यांची उपासना पध्दती, मंत्रात्मकता, निरनिराळया रुढी इत्यादींचा प्रवाह आदिवासी जीवनामध्ये अखंडीतपणे सुरुच आहे.

आदिवासी माणूस स्वतःच्या जीवनामध्ये आधार षोधीत असतो ज्यायोगे त्याला विश्वास वाटेल असे विधी तो करतो. त्यामुळे एकप्रकारची मानसिक शक्ती त्याला लाभते. कृषीकर्म करतांनाचा विधी, पाऊस येण्यासाठीचा विधी, सुपलीकरणाचा विधी, कोणताही आजार झाल्यास त्यावर उपचार म्हणून करण्यात येणारा विधी इ. प्रकारचे विधी तो साजरे करतो. हे करण्यामागे कोणतातरी आदितत्वीय आधार असतो.

कृषी कर्म करतांनाचा विधी-

जगातील सर्वच देशात कृषिविषयक यंत्रतंत्रात्मक विधीमध्ये एकेकाळी वामाचाराला विशेष महत्त्व होते. आदिवासी समाजात आजही हे विधी मूळ वामाचारी स्वरुपात पाहावयास मिळतात. अधिक धान्य पिकावे, समृध्दी व्हावी, पिकांवर आलेली रोगराई दूर व्हावी यासाठी काही यात्वात्मक क्रिया केल्या जातात. या सर्व क्रियांमध्ये स्त्रियांना महत्त्वाचे स्थान असते. संपन्नतेचा आणि सुपिकतेचा संबंध सर्वत्र रुढ आहे. शेतीतील उत्पादन शक्ती आणि स्त्रीची जनन क्षमता यात विलक्षण साम्य आदिमानवाला दिसले. आदिवासी 'संथाळ' जमातीमध्ये श्रावण महिन्यात 'हरियार सिंग' नावाचा सण साजरा करतात. भूया, कोळ, भिंगेड हे लोक आपल्या बैगा पूरोहिताकडून भूमीच्या सुफलीकरणाचा विधी करवून घेतात. यात पेरणीपूर्वी अथवा कापणीच्या वेळी भूमातेला मद्य-मासाचा नैवैध्य देतात. शेतात पीक चांगले यावे, त्या जमिनीचे सुफलीकरण व्हावे याकरीता विवस्त्र स्त्रिला नांगरलेल्या जमिनीत फिरविण्याची पुरातन पध्दती थोडयाफार प्रमाणात बदल करून आजही अस्तित्वात आहे. अर्ध विवस्त्र स्त्रिने नांगर धरायचा, गर्भवती स्त्रिने नापिक जमिनीवर फिरायचे, निपूत्रिक स्त्रिच्या हातून पीक येत नाही म्हणून तिच्या हातून अजूनही रोपे लावली जात नाही. यासारखे विधी आजही अस्तित्वात असल्याचे दिसते.

जलसिंचन हे पावसाचे प्रतिक आणि विवस्त्र स्त्री हे भूमीचे प्रतिक. प्राथमिक मानवाच्या दृष्टीने स्त्रीची गर्भधारणा आणि भूमीची सुफलता या दोन्ही प्रक्रिया एकच समजल्या जातात. भूमी वनस्पतींना जन्म देते, त्याअर्थी भूमीच्या ठिकाणी सुफलीकरणाचे नैसर्गिक सामर्थ्य आहे अषा कल्पनेतून या विविध श्रध्दा जन्माला आलेल्या आहेत. या प्रसंगी गाणीही गायीली जातात.

पाऊस मागण्याचा विधी-

'डेडरा माता पानी दे'।। पानी कायोम, सेरोम, सेरोम, डेडरा माता पाणी दे पानी दे।।

असे गीत नृत्याच्या साथीने गात घरोघरी पाण्याचे दान मागत फिरणाऱ्या आदिवासी कुमारिका पाऊस न आल्यास फिरतांना दिसतात. डोईवर बांबूची छोटीसी टोपली त्यात निबांच्या डहाळया मधे बेडूक, गीत गात प्रत्येक घरी जायचे त्या घरच्या व्यक्तींनी त्या कुमारीकेच्या अंगावर, डोईवर-बेडकाच्या अंगावर पाणी टाकायचे, दान द्यायचे असा हा विधी आदिवासी संस्कृतीमध्ये दिसतो. इथेही स्त्री आणि पाणी त्यासोबतच बेडकाचे असलेले आदिम जीवनातील महत्त्व प्रतिपादित होते.

पाऊस पडावा म्हणून स्त्रियांनी विवस्त्रावस्थेत शेतात जाऊन नृत्य करण्याची क्रिया करायची असते.

शेतीच्या, वनस्पतीसृष्टीच्या सुफलीकरणाशी मद्य आणि मैथून याचा फार घनिष्ठ संबंध असल्याचे प्राथमिक मानवाच्या आचार विधीवरून दिसून येते, बैगा, गोंड, संथाळ, भिल्ल या सर्व वन्य जमातीत मद्याशिवाय पेरणीचे कामच होत नाही. प्रथम भूमिला मद्याची आहुती द्यावी लागते, रजःस्त्रावा प्रमाणेच मद्याच्याही ठिकाणी नवजीवन देण्याचे सामर्थ्य आहे ही श्रध्दा सार्वत्रिक आहे.

हे आदितत्व या विधी नाटयाच्या ;त्तुंउंजपब त्पजनंसद्ध द्वारा आदिवासीनी आपल्या मौखिक परंपरेतून लोकसंस्कृतीतून जतन करून ठेवली आहे.

निळी घोडी -

महादेव कोळी या आदिवासी समाजाच्या दिवाळी सणाच्या गाण्यात

''चावडीत व्हती निळी घोडी
लाता मारी फडाफडी''

'निळी घोडी' हा शब्द प्रयोग आल्याचे दिसते 'निळी घोडी' हे काम तत्वाचे प्रतिक याही आदितत्वाचा आपल्याला विचार करावा लागतो.

भोज्या पक्षी - (पावश्या)-

शेतकऱ्याच्या जीवनात रोहिणी नक्षत्रातला पाऊस महत्त्वाचा परंतु पाण्याचा थेंब नाही. पावश्या पक्षाचा भोज्या पक्षाचाही आवाज नाही तेव्हा,

''मोठे मोठे खोरील-भोजानी लाहोला-भोजानी
लाहो केल-पानी न बलबला
पानी ल चितचा - कुलब्यांचे हिताचा''

भोज्यापक्षाचे ओरडणे म्हणजेच पावसाळा सुरवात हा समज या गीतात षब्दरुप होऊन प्रकटला आहे.

सृष्टीच्या उत्पत्तीची कथा-

कोरकू या आदिवासी जमातीमध्ये लोकगीतात पृथ्वी प्रथम कशी होती आणि मानवनिर्मिती कशी झाली याचे वर्णन पुढील गीतात पाहावयास मिळते.

हेरोम हेरा बासो मालय।
सेरोम सेरा मनकाय रो।।
हेरोके उपर लालो मालाय।
हेरोया जावू मोरा रे।।
आगासे दोगे काला चांदो।
धरेतु देखे धुवॉं चले।।
छत्तीस कोटी देवताकू टुंडीया जोडा।
छटन निजा सुबान केन।।
छेत्तीस कोटी देवताकू चोजा मनसुबा टोळेमाळ।।
कगलीया मासासे उसनी माटी।
आसिनी कुले भेजा, कगलीया मासा।।
देरीया टापून सेने छाल्या आफरीजा।।
बनाया दाने सुरतो बन दो।
बनाये दाने मुरतो बन दो।
हेरोम हेरा बासो मालाय, सेरोन सेरा मनकाय रो।।

या कथागीतात मानवाच्या, सृष्टीच्या निर्मितीची कथा स्त्रिला सांगण्यात येते हे माला, सृष्टीच्या निर्मितीपूर्वी एक मांडव होता. हिरव्या बांबूच्या या मांडवावर जांभूळीच्या झाडाच्या फांद्या होत्या आणि त्यावर लाल जांभळे चमकत होती. आकाशात काळा चंद्र होता धरतीवर धूर धूके पसरलेले होते. धरती थरकापत होती. अशा वेळी छत्तीस कोटी देवता वडाच्या झाडाखाली जमल्या आणि मानवाची निर्मिती करण्यासाठी माती आणण्याचे काम त्यांनी कगलिया मासा (किंवा काक भुसुंरुजी) म्हणजेच कावळयाकडे सोपविले. कावळा खूप दूरवर समुद्रापलीकडे माती आणण्यास गेला व त्यात त्याचे पंख झडले. या गीतात इतकाच भाग आलेला आहे. या कथेचा पुढचा भाग असा पंख झडल्यानंतर समुद्रकिनारी त्याला दीमक देवी (खेकडा/उधई) भेटली व तीने माती देण्याचे कबूल केले पण काम संपताच परत आणण्याच्या अटीवर कावळयाने ती माती आणली. देवतांनी मुर्ती बनविल्या व त्यात प्राण ओतले. परंतु माती परत करण्याचा प्रश्नशिल्लक राहिला. तेव्हा कबुलीप्रमाणे मनुष्य मृत झाल्यावर ती माती परत करायची म्हणून त्याला मातीतच पूरण्यात येते.

माती देण्याचे हे अदितत्व या गितात जोपासलेले दिसते. अषी कितीतरी आदितत्वे आदिवासीच्या या मौखिक परंपरेतील गीतामध्ये दिसतात. त्यातल्या काहीचाच इथे उल्लेख केलेला आहे. शोध निबंधाच्या मर्यादा लक्षात घेता सर्व इथे मांडणे शक्य नाही त्याचा विस्तृत लिहिण्याचा प्रयत्न नंतर होईलच.

**संदर्भ:**


- ‘आदिवासी साहित्य स्वरुप आणि समिक्षा’, ‘विनायक तुमराम’ विजय प्रकाशन नागपूर, पृ.क्र. ४७
- ‘सिंधू संस्कृती ऋग्वेद व हिंदू संस्कृती’, अॅड. प्र. रा. देशमुख, पृ.क्र. १२
- ‘टिका स्वयंवर’ भालचंद्र नेमाडे
- ‘लोकायत’ ‘स.रा.गाडगीळ’ लोकवाङमय प्रकाशन, मुंबई
- ‘महाराष्ट्रील आदिवासीचे लोकसाहित्य’ शैलेजा देवगावकर ‘साईनाथ प्रकाशन नागपूर’ पृ. क्र. ३२
- ‘प्राचीन भारतातील नाग’ ‘एच. एल. कोसारे’ ज्ञान प्रदिप प्रकाशन नागपूर
- ‘लोकसाहित्याचे अत:प्रवाह’ गोदावरी प्रकाशन औरंगाबाद’ डॉ. प्रभाकर मांडे
- ‘वारली लोकगीते’ कविता महाजन ‘साहित्य अकादेमी मुंबई’
- ‘लोकसंचित’ तारा भवाळकर ‘राजहंस प्रकाशन पुणे’